महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

जनसंपर्क विभाग : महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
'प्रकाशगड', प्लॉट क्र. जी-९, प्रो. अनंत काणेकर मार्ग, ४ था मजला, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१
संकेतस्थळ : www.mahadiscom.in दूरध्वनी : ०२२-६९८५२२०० ईमेल-prodiscomm@gmail.com
टोल फ्री क्रमांक : १८००-२३३-३४३५, १८००-२१२-३४३५, १९१२, १९१२०

प्रेसनोट इंग्रजी व मराठी - दि. 3 मे 2026

दिवसाच्या वीजवापरात ७० लाख ग्राहकांना २२३५ कोटी रुपयांचा लाभ

मुंबई, दि. ०३ मे २०२६: राज्यातील वीज ग्राहकांना सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीतील वीजवापरासाठी टीओडी (टाइम ऑफ डे) सवलत जुलै २०२५ मध्ये लागू केल्यापासून आतापर्यंत ७० लाख ग्राहकांना एकूण २२३५ कोटी रुपयांचा लाभ झाला असून त्यामध्ये १५,९०७ उच्चदाब औद्योगिक ग्राहक एकूण १५३४ कोटी रुपयांच्या लाभासह प्रथम स्थानावर आहेत, अशी माहिती महावितरणतर्फे देण्यात आली.

विजेचा वापर कोणत्या वेळेत झाला त्याच्या आधारे वीजदरात सवलत दिली जाते त्याला टीओडी सवलत म्हणतात. राज्यात जुलै २०२५ पासून १० किलोवॅटपेक्षा जास्त भार असलेल्या औद्योगिक व वाणिज्यिक वीज ग्राहकांना सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीतील वीज वापरासाठी सवलत देण्यात आली. या ग्राहकांना एप्रिल ते सप्टेंबर या महिन्यांसाठी १५ टक्के तर ऑक्टोबर ते मार्च या महिन्यांसाठी २५ टक्के इतकी मोठी सवलत देण्यात येत आहे.

सर्व घरगुती ग्राहकांनाही प्रथमच टीओडी सवलतीचा लाभ देण्यास सुरुवात झाली असून चालू आर्थिक वर्षात सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीतील वीजवापरासाठी प्रती युनिट ८५ पैसे सवलत देण्यात येते. स्मार्ट मीटरमध्ये कोणत्या वेळी किती वीजवापर झाला हे मोजण्याची सुविधा असल्याने स्मार्ट मीटर बसविलेल्या घरगुती ग्राहकांना या सुविधेचा लाभ होत आहे.

औद्योगिक ग्राहकांमध्ये उच्च दाब औद्योगिक ग्राहक, उच्चदाब हंगामी औद्योगिक ग्राहक, लघुदाब औद्योगिक ग्राहक आणि यंत्रमाग असा एकत्रित विचार केला तर ४३,९११ औद्योगिक ग्राहकांना एकूण १,७७४ कोटी रुपयांचा लाभ झाला आहे. राज्यातील उच्चदाब व लघुदाब अशा ११,०१७ वाणिज्यिक ग्राहकांना एकूण २३९ कोटी रुपयांचा लाभ झाला आहे.

घरगुती ग्राहकांना टीओडीचा लाभ मिळण्यास सुरुवात झाल्यापासून त्यांना १,०९६ दशलक्ष युनिट इतक्या विजेसाठी ८९ कोटी रुपयांचा लाभ झाला आहे. या कालावधीतील लाभधारक घरगुती ग्राहकांची संख्या ६९,३५,३८८ इतकी होती.

राज्यात घरोघरी स्मार्ट मीटर बसविण्याच्या मोहिमेने वेग घेतला आहे. त्यासोबत टीओडी लाभ मिळणाऱ्या घरगुती वीज ग्राहकांची संख्याही वाढत आहे. सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीतील वीजदरातील सवलतीचा लाभ सार्वजनिक पाणीपुरवठा आणि अन्य सार्वजनिक सेवांसाठीही झाला आहे. या घटकांसाठी संबंधित १२,९८९ ग्राहकांना २०२ कोटी रुपयांचा टीओडी लाभ झाला आहे.

राज्यातील सौरऊर्जेसारख्या नवीकरणीय उर्जेची उपलब्धता वाढली आहे. ही वीज स्वस्त मिळत असल्याने महावितरणने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या आदेशानुसार दिवसाच्या वीजवापरासाठी सवलत लागू केली

आहे. वीज ग्राहकांनी अधिक विजेची गरज असणारी उपकरणे सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीत प्राधान्याने वापरून टीओडी सवलतीचा अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे.

Benefit of ₹2,235 Crore to 70 Lakh Power Consumers for Daytime Electricity Usage

Mumbai, 3rd May 2026: Maharashtra State Electricity Distribution Company Limited (Mahavitaran) has informed that since the implementation of the Time of Day (ToD) concession for electricity consumption between 9:00 AM and 5:00 PM in July 2025, 70 lakh electricity consumers across the state have collectively received benefits totalling ₹2,235 crore. Among these beneficiaries, 15,907 High Tension (HT) industrial consumers hold the top spot, having received a combined benefit of ₹1,534 crore.

A concession on electricity tariffs, granted based on the specific time of day during which the electricity is consumed, is known as the ToD concession. In the state, effective July 2025, a concession was introduced for industrial and commercial electricity consumers with a connected load exceeding 10 kW, specifically for electricity consumed between 9:00 AM and 5:00 PM. These consumers are currently receiving a substantial concession: 15 percent for the months of April to September, and 25 percent for the months of October to March.

For the first time, all domestic consumers have also begun to receive the benefits of the ToD concession. During the current financial year, a ToD concession of 85 paise per unit is being provided for electricity consumed between 9:00 AM and 5:00 PM. Since smart meters are equipped with the capability to precisely measure the quantity of electricity consumed at any given time, domestic consumers who have installed smart meters are currently benefiting from this facility.

When considering industrial consumers collectively–including High Tension (HT) industrial consumers, HT seasonal industrial consumers, Low Tension (LT) industrial consumers, and power loom units–a total of 43,911 industrial consumers have received benefits amounting to ₹1,774 crore. Furthermore, 11,017 commercial consumers across the state–comprising both HT and LT categories–have collectively received benefits totalling ₹239 crore.

Since the commencement of ToD benefits for domestic consumers, they have realized a total benefit of ₹89 crore, corresponding to a consumption volume of 1,096 million

units. The number of beneficiary domestic consumers during this period stood at 69,35,388.

The campaign to install smart meters in households across the state has gained momentum. Concurrently, the number of domestic electricity consumers availing of Time-of-Day (ToD) benefits is also on the rise.

The benefit of reduced electricity tariffs during the 9:00 AM to 5:00 PM window has also been extended to public water supply systems and other public services. Specifically for these sectors, 12,989 consumers have collectively received ToD benefits amounting to ₹202 crore.

The availability of renewable energy—such as solar power—has increased within the state. Since this electricity is available at a lower cost, Mahavitaran has implemented a concessional tariff for daytime electricity consumption, in accordance with the directives of the Maharashtra Electricity Regulatory Commission (MERC). Mahavitaran has appealed to electricity consumers to maximize their utilization of the ToD concession by prioritizing the use of high-energy-consuming appliances during the 9:00 AM to 5:00 PM timeframe.